**CNR No. MHOS120009582014**

**भूसंपादन निर्देशन अर्ज क्र. ७१८/२०१४**

**मनोहर वि.शासन व इतर**

**निशाणी क्र.३४ खालील आदेश.**

१. प्रस्तुतचा अर्ज मुळ अर्जदार मनोहर किसनराव उर्फ किरतराव पाटील यांचा मृत्यू दिनांक २४.०६.२०१५ रोजी झाल्यामुळे व प्रस्तुत अर्जदार हाच त्यांचा एकमेव कायदेशीर वारस असल्यामुळे अर्जदाराचे वारस म्हणुन प्रस्तुत अर्जदार याचे नांव प्रकरणात वारस या सदरी समाविष्ट करुन घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार मनोहर किसनराव उर्फ किरतराव पाटील यांचा मृत्यू २४.०६.२०१५ रोजी झाला. त्याबाबत अर्जदारांने तो मयताचा एकमेव वारस असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र अभिलेखावर दाखल केले आहे. त्याने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदार यांनी सदरील अर्जास आक्षेप नोंदविला आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता हे स्पष्ट होते की, निशाणी क्र. ३८ वरील मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन करता दिनांक २४.०६.२०१५ रोजी अर्जदार नामे मनोहर किसनराव उर्फ किरतराव पाटील यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट होते. अर्जदाराच्या स्वयंघोषणा प्रतिज्ञापत्राचे अवलोकन करता अर्जदार हा मयत मुळ अर्जदार मनोहर किसनराव उर्फ किरतराव पाटील यांचा वारस असल्याचे दिसून येते. तसेच प्रस्तुत अर्जाच्या समर्थनार्थ दाखल केलेल्या शपथपत्रावरुन अर्जदाराचे कथन की, तो मयत मुळ अर्जदाराचा वारस आहे या कथनास पुष्टी मिळते. मुळ प्रकरण हे भु-संपादन कायदा कलम १८ अन्वये संपादीत जमीनीचा वाढीव मावेजा मिळण्यासाठी दाखल केले आहे. प्रकरणाचे स्वरुप पहाता प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणे

न्यायोचित आहे. सबब, खालील आदेश.

## **आदेश**

१. निशाणी क्र. ३४ खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जदाराने मुळ अर्जात योग्य ती दुरुस्ती निशाणी क्र. १ मध्ये आज पासून १४ दिवसांच्या आत करण्याची आहे.

३. प्रस्तुत अर्जाचा खर्च प्रस्तुत अर्जदार यांनी सोसण्याचा आहे.

RAHUL DATTATRAY DANGE

Digitally signed by RAHUL DATTATRAY DANGE
Date: 2026.07.14 17:47:50 +0530

दिनांक – १४.०७.२०२६

(राहुल द. डांगे),
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Mr. Sayyad R.M.,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Mr. R. D. Dange<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom, District - Osmanabad. |
| Date | --- | 14/07/2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 14/07/2026 |
| Order uploaded on | --- | 14/07/2026 |